# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः31.01.2025** **वारःशुक्रवार**

**ठळक बातम्या**

१. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणानं संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आजपासून आरंभ, आर्थिक सर्वेक्षणही आज सादर होणार

२. वक्फ सुधारणा विधेयकासंदर्भातील संयुक्त संसदीय समितीचा अहवाल लोकसभा सभापतींना सादर

३. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींना पुण्यतिथीनिमित्त देशाची आदरांजली

४. तिसऱ्या विश्व मराठी संमलेनाला आजपासून पुण्यात प्रारंभ; मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार उद्घाटन

५. उत्तराखंडमधील 38 व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत राज्यातील खेळाडूंची चमकदार कामगिरी

आणि

६. भारत आणि इंग्लंड यांच्यातला 20 षटकांचा चौथा क्रिकेट सामना आज पुण्यात

**संसद अधिवेशन**

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून सुरू होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणानं अधिवेशनाची सुरुवात होईल. त्यानंतर आर्थिक सर्वेक्षण अहवाल सादर करण्यात येईल. त्यानंतर उद्या केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन 2025-26 या आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प सादर करतील. राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारदर्शक ठरावावर सोमवारी दोन्ही सभागृहात चर्चा होईल. या अधिवेशनात 16 वित्त विधेयकांसह, वक्फ(सुधारणा), स्थलांतर आणि परदेशी नागरिक, बँकिंग कायदा (सुधारणा), रेल्वे सुधारणा ही विधेयकं चर्चेसाठी मांडली जाणार आहेत. आजपासून सुरू होत असलेल्या अधिवेशनाचं पहिलं सत्र पुढील महिन्याच्या 13 तारखेपर्यंत सुरू राहणार आहे. तर दुसरं सत्र 10 मार्च ते 4 एप्रिल कालावधीत पार पडणार आहे.

**सर्वपक्षीय बैठक**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्र्वभूमीवर काल नवी दिल्लीत सर्वपक्षीय बैठक बोलावण्यात आली होती. यामध्ये, अधिवेशनाच्या काळात दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळितपणे पार पाडण्यासाठी सहकार्य करण्याचं आवाहन सरकारच्या वतीनं करण्यात आल्याचं संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं. संरक्षण मंत्री राजनाथसिंह, आरोग्य मंत्री जेपी नड्डा, काँग्रेसचे खासदार जयराम रमेश, गौरव गोगोई, तसंच तृणमूल काँग्रेसचे सुदीप बंदोपाध्याय, समाजवादी पक्षाचे राम गोपाल यादव, बिजू जनता दल, द्रमुक अशा विविध पक्षांचे खासदार बैठकीला उपस्थित होते.

**वक्फ अहवाल**

वक्फ सुधारणा विधेयकासंदर्भात नेमण्यात आलेल्या संयुक्त संसदीय समितीच्या शिफारशींचा अहवाल काल लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांना सादर करण्यात आला. समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी संसद भवनात बिर्ला यांची भेट घेऊन त्यांना हा अहवाल सुपूर्द केला.

**म.गांधी अभिवादन**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त काल संपूर्ण देशभरातून त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. हा दिवस हुतात्मा दिन म्हणूनही पाळला जातो, त्यानिमित्तानं स्वातंत्र्यलढ्यात हौतात्म्य पत्करणाऱ्यांना देखील काल अभिवादन करण्यात आलं. नवी दिल्लीतल्या राजघाट या गांधीजींच्या समाधीस्थळी काल सकाळी सर्वधर्म प्रार्थनेचं आयोजन करण्यात आलं होतं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गांधीजींच्या समाधीवर पुष्पचक्र वाहून अभिवादन केलं. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, विरोधी पक्षनेते राहूल गांधी यांनीही राजघाटावर पुष्पांजली अर्पण केली. हुतात्मा दिनानिमित्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी काल राजभवनात दोन मिनिटं मौन पाळून हुतात्म्यांना आदरांजली अर्पण केली.राज्यपालांनी यांनी काल मुंबईतल्या मणीभवन इथंही भेट दिली.महात्मा गांधींच्या पुण्यतिथीनिमित्त राज्यात विविध उपक्रमांद्वारेही त्यांना आदरांजली वाहण्यात आली.

**अहिल्यादेवी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी केलेल्या कार्याची तसंच त्यांच्या शौर्याची चित्ररथाच्या माध्यमातून दिली जाणारी माहिती युवापिढीला दिशादर्शक ठरेल, असा विश्वास विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी काल व्यक्त केला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 300 व्या जयंती वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य विभागानं तयार केलेल्या चित्ररथाचं उद्घाटन राम शिंदे आणि मंत्री आशिष शेलार यांच्या दूरस्थ उपस्थितीमध्ये झालं; त्यावेळी ते बोलत होते. अहिल्यानगरच्या पोलीस कवायत मैदानावर आयोजित या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

**विश्वमराठी**

तिसरं विश्व मराठी संमेलन आजपासून पुण्यात फर्ग्यूसन महाविद्यालयाच्या मैदानावर सुरू होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सकाळी 11 वाजता संमेलनाचं उद्घाटन होईल. येत्या 2 फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या संमेलनात शोभायात्रा, चर्चा, परिसंवाद, मुलाखती, सांस्कृतिक कार्यक्रम, लोककलांचं सादरीकरण अशा अनेक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मुख्य मंच, आणि प्र. के. अत्रे सभागृहात हे कार्यक्रम होणार आहेत.

**मुख्यमंत्री**

नवी दिल्लीमध्ये होणाऱ्या 98 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला सर्वतोपरी पाठबळ दिलं जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिल्लीत सांगितलं. 21 ते 23 फेब्रुवारी या कालावधीत होणाऱ्या या साहित्य संमेलनासाठी महाराष्ट्र सदनातील कार्यालयाचं उद्घाटन काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. त्यावेळी ते

बोलत होते. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यावेळी उपस्थित होते. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर आणि मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर दिल्लीत होणाऱ्या या संमेलनाला विशेष महत्व आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**जीबीएस-सह्याद्री**

जीबीएस आजाराच्या पार्श्वभूमीवर सर्व यंत्रणांचं वेगानं काम सुरू आहे, आणि रुग्णवाढीचा वेग आता हळूहळू कमी होत आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिल्लीत माध्यमांशी बोलताना सांगितलं. ते म्हणाले....

**बुलढाण्यातला विषय वेगळा आहे पुण्यातला विषय वेगळा आहे , बुलढाण्यात काही गोष्टी अधिकच्या आढळून आल्या म्हणून त्याचा एक रिपोर्ट आपण घेतलेला आहे , त्याचा अंतिम अहवाल आल्यावर त्याच्या निष्कर्षाला आपण पोहचू , पुण्यातला जो विषय आहे त्यात विशेषतः नांदेड सिटी च्या भागामध्ये विहिरीतून जे पाणी येत त्यात जास्त कन्टॅनीमेशन आढळलं आहे, केसेस पीक वर गेल्या आणि मग ते लक्षात आलं कि इथन होतंय , आणि त्यावर उपाय योजना केल्यावर आता ते खाली आलेलं आहे. मात्र ज्या काही केसेस आहेत त्याकडे गांभीर्याने आम्ही लक्ष देत आहोत. कारण या केस मध्ये अचानक माणसाची प्रतिकारशक्ती कमी होते मग नर्व्ह वर त्याचा परिणाम होतो , आणी एक प्रकारे शारीरिक दुर्बलता त्यांच्यात निर्माण होते, 90 95 टक्के केसेस मध्ये 100 टक्के तो बरा होतो पण चार पाच टक्के केसेसमध्ये त्याचा काही परिणाम राहून जातो , त्यामुळे याकडे गांभीर्याने पाहायला हवं.**

**रब्बी**

राज्यात रब्बी हंगामात सरासरी क्षेत्रापेक्षा अधिक म्हणजे 117 टक्के क्षेत्रावर पेरण्या झाल्या आहेत. त्यामुळे खरीप हंगामातील पिकांप्रमाणेच रब्बी हंगामातील धान्य उत्पादनातही वाढ होणार असल्याचा कृषी आयुक्तालयाचा प्राथमिक अंदाज आहे. रब्बी हंगामात हरभरा हे प्रमुख पीक झालं असून, त्याखालोखाल गहू, मका या पिकांचा पेराही सरासरीपेक्षा अधिक झाला आहे. खरीप हंगामात झालेला मुबलक पाऊस, धरणांमध्ये पाण्याचा मुबलक साठा, भूगर्भातील चांगली पाणी पातळी यामुळे पेरणी क्षेत्रात भरीव वाढ झाली असं पुणे कृषी आयुक्तालयाचे मुख्य सांख्यिक वैभव तांबे यांनी सांगितलं.

**राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा**

उत्तराखंडमधे सुरू असलेल्या 38 व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राचे खेळाडू चमकदार कामगिरी करत आहेत. महाराष्ट्राच्या खात्यात अनेक पदकं जमा झाली असून काल ट्रायथलॉन इव्हेंटमध्ये म्हणजेच वैयक्तिक ट्रायथलॉन, संमिश्र रिले आणि ड्युअथलॉनमध्ये महाराष्ट्राच्या संघानं सर्वोत्कृष्ट कामगिरी करत सहा पदकांची कमाई केली. वैयक्तिक ट्रायथलॉन मध्ये पुरुष गटात पार्थ मिरजे यानं कास्य तर महिला गटात डॉली पाटील आणि मानसी मोहिते या दोघींनी सुवर्ण आणि रौप्य पदक पटकावलं. या स्पर्धेत सायकलिंग क्रीडा प्रकारात महाराष्ट्राच्या पूजा दानोळे हिनं सुवर्णपदक मिळवता कालचा दिवस गाजवला. मूळची कोल्हापूरच्या असलेली पूजा हिनं काही वर्ष पुण्यातल्या क्रीडा प्रबोधिनीतही सराव केला आहे. या यशाबद्दल तिनं आकाशवाणीशी संवाद साधला....

**यशाची अपेक्षा होती पण मागच्या काही स्पर्धेत तांत्रिक गोष्टी काही चुकीच्या झाल्या होत्या माझ्या बाबतीत त्यामुळे आणि सगळ्या मुली माझ्या पेक्षा सिनियर होत्या ती पण एक भीती होती पण मी माझं बेस्ट देईल हे मी डोक्यात ठेवलं होत, त्याप्रमाणे मी बेस्ट दिल इथून पुढे राष्ट्रीय साठी माझे 4 इव्हेंट आहेत त्यात सुद्धा मी माझे बेस्ट देईल व त्यासाठी मी महाराष्ट्रासाठी किंव्हा माझ्या टीम साठी मी बेस्ट देईल आणि गोल्ड मिळवण्याचा प्रयत्न करेल , आणि राष्ट्रीय खेळा नंतर मला पुढे एशियन आणि वर्ल्ड कप मध्ये गोल्ड मिळवायचा आहे आणि भारताला रि प्रेझेंट करायचे आहे हे माझे लक्ष्य आहे.**

**क्रिकेट**

भारत आणि इंग्लंड यांच्यातला 20 षटकांचा चौथा सामना आज पुण्यात होणार आहे. संध्याकाळी 7 वाजता सामना सुरू होईल. पाच सामन्यांच्या या मालिकेत भारत 2-1 नं आघाडीवर आहे.

**हवामान**

राज्यात सर्वत्र आज हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.